सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रं.२.ची साक्ष
देवा शपथ खरे सांगेण की,

नाव : वाजीत अब्दुल खान
वय : ७६ वर्षे, धंदा : निवृत्त ,
राहणार : बोपोडी .

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती आम्रपाली कस्तुरे :-**

१. फिर्यादी माझी मुलगी आहे व आरोपी तिचे सासरचे लोक हत. फिर्यादीचे लग्न नोव्हेंबर २०१२ मध्ये पुणे येथे झाले. लग्नामध्ये आरोीपंना गृहपयोगी साहित्य, १ तोळयाची अंगठी, वॉशिंग मशिन इ. वस्तू दिल्या. तसेच लग्नाचा खर्च आम्ही केला.

२. लग्नानतर फिर्यादी कोंढवा येथे आरोपींचे घरी नांदणेस गेली. तेथे फिर्यादीचा नवरा व सासु-सासरे राहत होते. फिर्यादी लग्नापूर्वी आयटी मध्ये काम करत होती. फिर्यादीला आरोपीने दोन महिने व्यवस्थीत ठेवले. फिर्यादीला एक वेळेस तिच्या सासुने घरात कोंडून ठेवले. फिरर्यादी सणासाठी एकवेळेस घरी आली होती. त्यानंतर फिर्यादीच्या सासऱ्यांचा आम्हाला भेटायला या असा फोन आला. त्यानंतर मी, फिर्यदी, पत्नी, माझ्या मेव्हणीचा मुलगा व मेव्हणी असे पाच लोक भेटायला गेलो. तेथे फिर्यादीच्या सासुने माझ्या पत्नीला सांगितले की तुमच्या मुलीच्या भेजा नाही. तेथे मी, माझी मेव्हणी व मेव्हणीचा मुलगा एकही शब्द बोललो नाही. त्यानंतर आम्ही घरी जाण्यासाठी निघालो. फिर्यादीचा छळ करायला लागले म्हणून तिने आम्हाला फोन केला. आम्ही त्याच रात्री घरी घेवून आलो. आम्ही आरीपंकडे फिर्यादीला नांदविणेसाठी विचारयला गेलो होतो परंतु फिर्यादीच्या सासऱ्याने माझा मुलगा येथे नहाी असे सांगून आम्हाला खालच्या खाली पाठवले. फिर्यादीच्या सासुने, मायक्रो वेव्ह, डायनिंग टेबल वॉशिंग मशीन तसेच आरोपी क्र. १ च्या बहिणीला ऑस्ट्रेलिया येथे जाण्यासाठी २ लाख रुपये इत्यादीची मागणी केली होती असे फिर्यादीने सांगितले. आरोपी क्र. १ च्या मेव्हण्याने माझ्या मेव्हण्याला तो जेव्हा चौकशी करायला आरोपी क्र. १ चे घरी गेला

होता तेव्हा हाकलून दिले होते. मी फिर्यादीला पुन्हा तिचे सासरी घेवून गेलो होतो परंतु तिच्या सासुने तेथे ड्रामा केला. त्यानंतर मी एकही शब्द न बोलता घरी आलो. फिर्यादीने पोलीस ठाण्यात तक्रार केल्याची मला माहिती आहे. त्याअनुषंगाने पोलीसांनी माझेकडे चौकशी केली होती व तपासटिपण लिहून घेतले होते. आजरोजी आरोपी क्र. २ व ३ न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण** .

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. ए.ए.अशर्फी यांचेमार्फत -</u>**

३. आरेीप क्र. १ ला एक तोळे सोन्याची चैन खरेदी केल्याची पावती पोलीसांना दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, लग्नामध्ये हुंडा दिला नाही व मागितला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी आमच्याकडून हुंडा मागितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी सासरी केवळ दोनच महिने राहिली व त्यानंतर राहिली नाही.

४. मी पोलीसांकडे तपासटिपण नोंदविताना आरोपींनी फिर्यादीला कोंडून ठेवले होते असे सांगितले नव्हते. तसेच मी पोलीसांकडे तपासटिपण नोंदवितान फिर्यादी सणाचे वेळी आमचे घरी आली होती असा मजकूर सांगितला नव्हता. पोलीसांकडे तपासटिपण नोंदविताना फिर्यादीच्या सासऱ्याने भेटायला या म्हणून आम्हाला बोलाविल्याचे सांगितले होते. परंतु तसा मजकूर पोलीसांनी का लिहून घेतला नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. आम्ही फिर्यादीच्या सासरी पाच लोक गेलो होतो असे तपासटिपण नोंदवितांना मी सांगितले नव्हते. मी पोलीसांकडे तपासटिपण नोंदविताना फिर्यादीची सासु माझ्या पत्नीला तुमच्या मुलीचा भेजा नाही असे म्हणाल्याचे सांगितले नव्हते. तसेच मी पोलीसांकडे तपासटिपण नोंदविताना मी तेथुन काही न बोलता निघुन आलो असे सांगितले नव्हते. फिर्यादी माण्याकडे आल्यानंतर तिला आरोपींकडून छळ होत आहे असे तिने सांगितल्याचे मी पोलीसांना तपासटिपण नोंदविताना सांगितले नव्हते. मी पोलीसांकडे तपासटिपण नोंदविताना आरोपींनी मुलीला पाठवू नका असे

म्हटल्याचे सांगितले होते परंतु तसा मजकूर तपाटिपणात नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांकडे तपासटिपण नोंदविताना आरोपी क्र. २ ने पैसे मागितले असे सांगितले होते व तसा उल्लेख तपासटिपणात आहे.मी पोलीसांकडे तपासटिपण नोंदविताना आरोपी क्र. २ ड्रामा करत होती व आम्ही एकही शब्द न बोलता परत आलो असा मजकूर सांगितला होता परंतु ते तपासटिपणात का नमूद नाही हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी माझ्याकडे मायक्रो वेव्ह, डायनिंग टेबल व २ लाख रुपये इत्यादीची मागणी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी फिर्यादीकडे मायक्रावेव्ह, डायनिंग टेबल व २ लाख रुपये इत्यादीची मागणी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादीने देखील मला आरोपींनी तिच्याकडे मायक्रावेव्ह, डायनिंग टेबल व २ लाख रुपयाची मागणी केली होती हे सांगितले नव्हते.हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीकडे मायक्रोवेव्ह, वॉशिग मशिन व फ्रिज, डायनिंग टेबल व २ लाख रुपयाची मागणी केली व तिचा छळ केला हे मी खोटे सांगत आहे. फिर्यादीने सदर वस्तूंची मागणी कधी केली होती त्याची तारीख व वेळ मला फिर्यादीने सांगितली नव्हती. त्याचप्रमणे आरोपींनी फिर्यादीकडे सदरच्या वस्तू व पैसे याची मागणी कधी केली त्याची तारीख व वेळ त्याची तारीख फिर्यादीने मला सांगितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी क्र. १ ने एकमेकांना पसंत करुन लग्न केले व ते दोघे एकाच ठिकाणी काम करत होती. मी जेवण बनवण्याचे काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, आमच्यापेक्षा आरोपींची आर्थिक परिस्थिती चांगली आहे व आमची हलाखीची आहे. आरोीपंनी लगनामध्ये फिर्यादीला दीड तोळे सोन्याचा सेट दिला होता व त्याचप्रमाणे दोन ते अडीचशे लोकांना जेवण दिले होत. हे म्हणणे खरे आहे की, लग्नामध्ये आरोपींचा पाच लाख रुपये खर्च झाला होता. फिर्यादीच्या लग्नाच्या वेळेस आमचे घर नव्हते. हे म्हणणे खरे नही की लग्नानंतर आरोपींनी आम्हाला पाच वाजता बोलावले होते परंतु आम्ही १ वाजताच गेलो होतो. आम्ही ज्या वेळे आरोपींना फिर्यादीला नांदवून घेण्यसासाठी विचारयला गेलो होता त्यावेळी सकाळी १०.३०

वाजता गेलो होतो व आम्ही न बोलावता गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी आमचे सोबत माझा पोलीसात असलेला पुतन्या राजू सोबत होता. हे म्हणणे खरे आहे की, राजूने सांगितल्याप्रमाने आम्ही पहिल्यांदा पोलीस ठाण्यात गेलो व तेथुन आरोपीच्या घरी गेलो. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी फिर्यादीने आरोपी क्र. २ ला मारले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आरोपी क्र. २ ससुनला गेले. आता मला नि.क्र. क्र. ३९ दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.३९ कडील फिर्याद आम्ही घरात चर्चा करुन दिली. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीचा आरोपींनी छळ केला नसल्याने व तिच्याकडे कशाचीही मागणी केली नसल्याने त्याचा उल्लेख नि.क्र. ३९ कडील फिर्यादीमध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यदी व आरोपी क्र. १ लग्नापूर्वी अगर लग्नानंतर फिरण्यासाठी मुंबईला गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर फिर्यादी व आरोपी क्र. १ अहमदाबाद येथे फिरण्यासाठी गेले होते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादी व आरोपी क्र. ३ ला अहमदाबाद येथे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरेपी शिक्षित आहेत व तिघेही काम करत होते व कमावित होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या सारसचे घर दोन बेडरुमचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या घरी काम करण्यासाठी नोकर होता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला आरीेपंनी कोणताही त्रास दिला नव्हता व चांगल्या प्रकारे ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा कथन केला आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

समक्ष,

सही/-
(अ.अ.कुलकर्णी)
३रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.

दिनांक : १०/०७/२०२५.